# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.02.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत
- पहिली जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषद मुंबईत होणार.
- त्रिपुरा सरकारनं विविध उदयोगा सोबत केले 3700 कोटी रुपयांचे सामंजस्य करार
- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रानं जिंकली सर्वाधिक 107 पदकं.

आणि

- भारत आणि इंग्लंड यांच्यात कटकमध्ये आज दुसरा एकदिवसीय क्रिकेट सामना

**दिल्ली विधानसभा**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. दिल्ली विधानसभेत भाजपला 48 तर आम आदमी पक्षाला 22 जागा मिळाल्या आहेत. काँग्रेस सलग तिसऱ्यांदा 'शून्या' वर आल्याचं दिसून आलं आहे. भाजपला 27 वर्षांनी दिल्लीची सत्ता मिळाली आहे.

भाजपाचे परवेश वर्मा नवी दिल्लीतून, जंगपुरातून तरविंदर सिंग, करवाल नगरातून कपिल मिश्रा, राजौरी गार्डनमधून मनजिंदर सिंग सिरसा, गांधीनगरमधून अरविंदर सिंग लव्हली, ग्रेटर कैलाशमधून शिखा रॉय आणि मोती नगरातून हरिश खुराना विजयी झाले आहेत.

नवी दिल्लीतून अरविंद केजरीवाल, जंगपुरातून मनीष सिसोदिया आणि ग्रेटर कैलाशमधून सौरभ भारद्वाज हे आपचे ज्येष्ठ नेते तर पूर्व दिल्लीतून काँग्रेसचे संदीप दीक्षित पराभूत झाले आहेत. कालकाजी मतदारसंघातून आपच्या आतिशी मारलेना विजयी झाल्या आहेत.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या 48 जागांच्या यशातून एन डी ए सरकारच्या विकास आणि सुशासनाची हमी दिसून येते, खोट्या आश्वासनांनी जनतेची दिशाभूल करता येत नाही असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उत्तम प्रशासन आणि विकासामुळे भाजपा विजयी झाला असून जनशक्ती सर्वश्रेष्ठ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. दिल्लीकरांच्या प्रेमाची परतफेड विकासरूपानं करू, असं आश्वासनही मोदी यांनी यावेळी दिलं.

प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जनतेची सेवा करणारं सरकार मिळाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. दिल्लीच्या जनतेनं भाजपावर विश्वास ठेवल्याचं सिद्ध झालं असून मोदी यांच्या नेतृत्वात दिल्लीचा संपूर्ण कायापालट होईल असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.

दिल्लीकरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवला असून अरविंद केजरीवाल यांचा बुरखा फाडला आहे असं सांगताना भाजपा लोकांच्या अपेक्षा पूर्ण करेल असं महाराष्ट्रचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.

आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी पराभव मान्य करत असल्याचं म्हटलं आहे. दिल्लीतील जनादेश नम्रतेने स्वीकारत असल्याचं काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे तर काँग्रेस आत्मपरीक्षण करेल असं प्रियंका गांधी यांनी म्हटलं आहे.
दरम्यान, उत्तर प्रदेशातील मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघातून भाजपचे चंद्रभानू पासवान विजयी झाले आहेत. त्यांनी समाजवादी पक्षाचे अजित प्रसाद यांचा 61700 पेक्षा जास्त मतांनी पराभव केला आहे. तामिळनाडूतील इरोड पूर्व विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत द्रमुकचे चंदीराकुमार व्ही सी विजयी झाले आहेत.

**वैष्णव**

पहिली जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषद – वेव्हज् भारताला सामग्री निर्मितीसाठी जागतिक केंद्र बनविण्यास मदत करेल असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमांवरील एका संदेशात म्हटलं आहे. भारत सर्जनशीलतेच्या बाबतीत जगातील पॉवरहाऊस बनण्याचा पाया रचत आहे. जगातील नामांकित माध्यम संघटनांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर प्रमुख व्यक्ती या परिषदेला उपस्थित राहणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी वेव्हज्च्या सल्लागार मंडळाची बैठक घेतली.या वर्षी पहिली वेव्हज् परिषद 1 ते 4 मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**नीट-युजी**

नीट-युजी वैद्यकीय प्रवेश परीक्षा येत्या 4 मे रोजी घेण्यात येणार असल्याचं एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया कालपासून सुरु झाली असून ती 7 मार्चपर्यंत चालणार आहे.

**रशिया**

एस्टोनिया, लाटविया आणि लिथुआनिया या बाल्टिक देशांनी रशियाच्या पॉवर ग्रिडवरून त्यांची वीज जोडणी अधिकृतपणे तोडली आहे. युरोपियन युनियनशी जुळवून घेण्याच्या आणि प्रादेशिक सुरक्षा आणखी मजबूत करण्याच्या उद्देशानं हे पाऊल उचलण्यात आलं आहे. याचा रशियासोबतच्या या देशांच्या तेल आणि वायू संबंधांवर विपरीत परिणाम होईल. आता या तिन्ही देशांना फिनलंड, स्वीडन आणि पोलंडच्या ग्रीडमधून वीज मिळेल. या निमित्तानं, युरोपियन युनियनचे अध्यक्ष , पोलंड आणि तीन बाल्टिक देशांचे अध्यक्ष लिथुआनियामध्ये आयोजित कार्यक्रमात आज सहभागी होणार आहेत.

**त्रिपुरा**

त्रिपुरा सरकारनं काल आगरतळा इथं समारोप झालेल्या दोन दिवसीय डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्हमध्ये शिक्षण, आरोग्यसेवा, कृषी आणि आयटी क्षेत्रातील 87 खाजगी गुंतवणूकदारांसोबत 3700 कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. त्रिपुराचे मुख्यमंत्री डॉक्टर माणिक साहा, उद्योग मंत्री संताना चकमा आणि वरिष्ठ राज्य सरकार आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, खाजगी क्षेत्रातील गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेड, क्रेन ग्लोबल सोल्युशन्स, GNRC हेल्थकेअर इत्यादी कंपन्याबरोबर सामंजस्य करार केले.

त्रिपुरामध्ये गुंतवणुकीसाठी देश-परदेशातील खासगी क्षेत्रातील कंपन्यांना आमंत्रित करण्याकरिता राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. इथं येणाऱ्या उद्योगांसाठी सुरळीत आणि जलद प्रक्रिया असावी असे प्रयत्न चालू आहेत असं मुख्यमंत्री साहा यांनी सांगितलं. उद्योगांना 30 दिवसांच्या आत ना हरकत प्रमाणपत्र तसंच सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देणार असल्याचं साहा यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या लँड बँक प्रणालीची गुंतवणूकदारांना उद्योगासाठी योग्य जागा शोधण्यात मदत होईल.

**प्राप्तिकर विधेयक**

येत्या आठवड्यात संसदेत नवीन प्राप्तिकर विधेयक आणण्यात येणार आहे, त्यानंतर ते संसदीय स्थायी समितीकडे पाठवलं जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल सांगितलं. दिल्ली इथं रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आर्थिक विकासाकरता आणि महागाईच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत आहेत, असं सीतारामन यांनी सांगितलं.

**वाहन स्क्रॅपिंग**

वाहन स्क्रॅपिंग धोरणाचा एक भाग म्हणून, जुन्या वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्रात सहा नोंदणीकृत सुविधा केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रांच्या सेवेचा लाभ घेणाऱ्या वाहनधारकांना नवीन वाहन खरेदी करताना एकंदर करात 10 टक्के सवलत मिळणार असल्याचं परिवहन विभागाने म्हटलं आहे. प्रदूषण कमी करणे, रस्ते सुरक्षा वाढवणे, इंधन कार्यक्षमता सुधारणे, देखभाल खर्च कमी करणे आणि नवीन वाहनांद्वारे अर्थव्यवस्थेला चालना देणे हे या धोरणाचं उद्दिष्ट आहे.

**मेक्सिको अपघात**

दक्षिण मेक्सिकोमध्ये झालेल्या एका भीषण बस अपघातात सुमारे 41 लोकांना आपला जीव गमवावा लागल्याचं वृत्त आहे. अपघात झाला तेव्हा ही बस कॅनकून आणि टाबास्को दरम्यान प्रवास करत होती. अधिक माहितीची प्रतीक्षा आहे.

**राष्ट्रीय क्रीडा**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक 107 पदकं जिंकली असून त्यात 23 सुवर्ण, 39 रौप्य आणि 45 कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून 39 सुवर्ण पदकांसह सेना दलं पहिल्या तर 30 सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. 10 हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत काल महिला गटात महाराष्ट्राच्या संजीवनी जाधव हिनं सुवर्णपदक पटकावलं असून पुरुषगटात किरण मानेला रौप्य पदक मिळालं आहे.

**बुद्धिबळ**

या वर्षीच्या खुल्या बुद्धिबळ ग्रँड स्लॅम मालिकेतील पाचपैकी पहिल्या स्पर्धेत, विश्वविजेता ठरलेला, भारताचा डी गुकेश बाद फेरीसाठी पात्र ठरला आहे. जर्मनीतील वेसेनहॉस इथं झालेल्या पात्रता फेरीच्या नवव्या आणि अंतिम फेरीत जगातील सर्वोच्च मानांकित खेळाडू, नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनकडून पराभूत होऊनही गुकेशने गुकेशनं 3 पूर्णांक 5 गुणांसह हा टप्पा गाठला. सात सामने अनिर्णित ठेवत आणि दोन सामने गमावत दहा मधील आठवं स्थान राखण्यात गुकेश यशस्वी ठरला.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यात आज कटकमधील बाराबती स्टेडियमवर तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा मर्यादित षटकांचा एकदिवसीय सामना होणार आहे. दुपारी दीड वाजता हा सामना सुरू होणार आहे. भारत या मालिकेत 1-0 आघाडीवर आहे. विराट कोहली गुडघ्याच्या दुखापतीतून बरा झाला असून आजचा सामना खेळण्यासाठी तो तंदुरुस्त आहे.

**या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.**